**नि.फौ.ख.क्रमांक.१०५/२०२२**

**निशाणी २०**

अभीयोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी

मी शपथेवर सांगतो कि,

माझे नावा :– महादेवी प्रदिप रेणापुरे,

वय :– ३५ वषे व्यवसाय :– शेती

राहणार :– वांगदरी, ता. रेणापुर, जि. लातुर.

**अभीयोपक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सरकारी वकिल श्री. व्ही.सी.मुरळीकर**

०१. घटना कधी घडली हे मला आठवत नाही. माझया पतीच्या दारु पिण्यावरुन आमच्यामध्ये व आरोपींमध्ये किरकोळ वाद झाला होता. त्यामुळे मी फिर्याद दिली होती. मला फिर्याद दाखवीली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. स्वाक्षरीस **निशाणी २१** देण्यात येते.

(साक्षीदाराने अभीयोगपक्षाला सहाय केले नसल्यामुळे सरकारी वकिलांनी साक्षीदाराला उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. सरकारी वकिलांना परवानगी देण्यात आली.)

०२. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती हे आमच्या गावातील आरोपी मंगेश कराड, उल्हास गंभिरे यांच्या सोबत दारु पिण्यासाठी जातात. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी मंगेश व उल्हास यांना काल दिनांक २५.०१.२०२२ रोजी तुम्हाला दारु पिण्यासाठी जायचे असेल तर तुम्ही दोघे जावा माझया नव–याला सोबत घेउन जात जाउ नका त्यांना दारुची सवय लावु नका असे म्हणले. हे म्हणणे खरे नाही की, तेव्हा त्यांनी माझया बोलण्याचा राग मनात धरुन दारु पिउन दिनांक २६.०१.२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास आमच्या घरात घुसले. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी मला व माझी सासु लता रेणापुरे यांना म्हणत होते की, आम्ही तुझया नव–याला दारु पिण्यास कधी शिकवले. हे म्हणणे खरे नाही की, तसे म्हणुन त्यांनी मला शिवीगाळ करण्यास सुरवात केली व मंगेश कराड याने त्याच्या हातातील चाकुने

माझया उजव्या हातातील तळहातावर मारुन जखमी केले. हे म्हणणे खरे नाही की, तसेच, उल्हास याने माझया पाठीत, हातावर लाथाबुक्यांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, घरातुन ते दोघे जात असतांना त्यांनी परत दारुची सवय लावली म्हणटले तर तुला खत्म करुन टाकिन अशि जिवे मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी आरोपींविरुद्ध फिर्याद दिली होती व ती पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहुन घेउन वाचुन दाखवुन त्यावर माझी सही घेतली होती.

03. मला माझी फिर्याद वाचुन दाखवीली. त्यास अधोरेखांकित भाग अ देण्यात येतो. अधोरेखांकित भाग अ हा खरा नाही. पोलीसांनी तो का लिहीला आहे त्याचे कारण सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी माझ्यामध्ये व आरोपींमध्ये भांडण मिटले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझया गावातील असल्यामुळे त्याला वाचवीण्यासाठी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास संपला

**आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास वकिल श्री. व्ही.ए.डिगुळे नाकारला**

उलटतपास संपला

फेरतपास नाही

श्रवणोत्तर निवेदन सिकृत्ती

Digitally signed by DNYANESHWAR MADHUKAR GITTE
Date: 2026.07.17 17:26:48 +0530

दिनांक १७/०७/२०२६

(ज्ञा.म.गित्ते)

रेणापुर

न्यायदंडाधीकारी प्रथम वर्ग रेणापुर

(कोर्ट नंबर २)